महाराष्ट्र शासन
अधिष्ठाता यांचे कार्यालय
शासकीय योग व निसर्गोपचार रुग्णालय
उत्तूर ,ता .आजरा ,जि .कोल्हापूर ४१६२२०
ईमेल :gynckolhapur@gmail.com
भ्रमणध्वनी क्र : ९८५०५३९४८९

जा.क्र.शायोनिरु /आस्था/कंअप/जाहिरात/१३ /२०२६-२७ दि.०२.०२.२०२६

# -: शुध्दीपत्रक :-
# जाहिरात

## शासकीय योग व निसर्गोपचार रुग्णालय उत्तूर ता. आजरा जि. कोल्हापुर येथील निवासी वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय अधिकारी पदे कंत्राटी पध्दतीने भरणेबाबत.

(Walk In Interview )

संदर्भ- १.वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक: आयुसे-०९२४/ प्र.क्र.७३/८३७४५२/११८११०४/आयु-१ दि. २८.०८.२०२५

२. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांचे पत्र क्र.आयुसे-१०२५/प्र.क्र.११८/१४१०२२७/आयु-१ दि .१२/११/२०२४

३. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांचे पत्र क्र.आयुसे-१०२१/ प्र.क्र. १३०(भाग-१) / ७३८१०२/आयु-१ दि. १९.१२.२०२५

४. जा.क्र.शायोनिम/आस्था/कंअप/जाहीरात /३३ /२०२६-२७ दिनांक : १४.०१.२०२६

उपरोक्त संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये शासकीय योग व निसर्गोपचार महाविद्यालय व संलग्नित रुग्णालय,उत्तूर ता.आजरा जि. कोल्हापुर येथील पदे मंजूर केली आहेत. संदर्भ क्र. २ अन्वये निवासी वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय अधिकारी पदे कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली असून संदर्भ क्र.३ अन्वये या रुग्णालयातील कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर भरावयाच्या निवासी वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय अधिकारी यांचे दरमहा एकत्रित ठोक मानधन निश्चित करण्यात आले आहे.

संदर्भ क्र.४ अन्वये शासकीय योग व निसर्गोपचार महाविद्यालय व संलग्नित रुग्णालय, उत्तूर ता. आजरा जि.कोल्हापूर येथील निवासी वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय अधिकारी या पदांवर केवळ ११ महिन्यांच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने मानधन तत्त्वावर तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करण्यासाठी

विविध अटी व शर्तीची पुर्तता करणा-या पात्र व इच्छुक उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती (Walk-In-Interview) शुक्रवार **दि.२३ /०१/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता** या महाविद्यालयात आयोजित केल्या होत्या.

सदर मुलाखतीच्या जाहिराती मध्ये **प्रशासकीय कारणास्तव अंशत: बदल** झाला असुन निवासी वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय अधिकारी या पदांवर केवळ ११ महिन्यांच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने मानधन तत्त्वावर तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करण्यासाठी विविध अटी व शर्तीची पुर्तता करणा-या पात्र व इच्छुक उमेदवारांनी प्रत्यक्ष मुलाखतीसाठी (Walk-In-Interview) आवश्यक त्या मूळ प्रमाणपत्र व इतर आवश्यक त्या कागदपत्रांसह **गुरुवार दि.१२/०२/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता** या महाविद्यालयात उपस्थित रहावे.

**रिक्त पदांचा तपशील खालील प्रमाणे-**

| अ.क्र | पदनाम | पदसंख्या | मुलाखतीचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | निवासी वैद्यकीय अधिकारी | ०१ | **गुरुवार दि.१२ /०२/२०२६** |
| २ | वैद्यकीय अधिकारी | ०४ | |
| **एकूण रिक्त पदे** | | **०५** | |

**पदसंख्येत बदल होण्याची शक्यता.**

टीप- १. उपरोक्त नमुद रिक्त पदावर मुलाखतीच्या/रुजु दिनांकापर्यत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून नियमित नियुक्तीने / पदोन्नतीने किंवा बदलीने किंवा अन्य प्रशासकीय कारणास्तव उमेदवार उपलब्ध झाल्यास, त्या संबंधित पदाच्या उमेदवारांचा मुलाखतीसाठी/नियुक्तीसाठी विचार केला जाणार नाही याची सर्व संबधित नोंद घ्यावी.

| | |
|---|---|
| प्रत्यक्ष मुलाखतीचे ठिकाण | अधिष्ठाता यांचे दालन शासकीय योग व निसर्गोपचार महाविद्यालय व संलग्नित रुग्णालय,उत्तूर ता.आजरा जि. कोल्हापुर<br>जे.पी.नाईक स्मारक सभागृह, बहिरेवाडी,ता. आजरा जि. कोल्हापुर |
| प्रत्यक्ष मुलाखतीचा दिनांक | गुरुवार दि.१२ /०२/२०२६ |
| प्रत्यक्ष मुलाखतीची वेळ | सकाळी - १०.०० वाजता (दुपारी ११.०० नंतर येणाऱ्या उमेदवारांचा मुलाखतीसाठी विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी) |

| पदनाम | | निवासी वैद्यकीय अधिकारी (**Residential Medical Officer)** |
|---|---|---|
| वयोमर्यादा | : | **कमाल वयोमर्यादा** ५७ वर्षा**पर्यंत** जास्त नसावे. (प्रत्यक्ष मुलाखतीच्या दिवशी) |
| शैक्षणिक अर्हता | : | १.संविधिक विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची योग व निसर्गोपचार पदव्युत्तर पदवी (B.N.Y.S. MD) / आयुर्वेद पदव्युत्तर पदवी (B.A.M.S. MD)<br>२.किमान ३ वर्षे क्लिनिकल अनुभव (मान्यता प्राप्त नॅचरोपॅथी /योगिक सायन्सेस किंवा आयुर्वेद महाविद्यालय/रुग्णालयात) |
| इतर पात्रता | : | १.क्लिनिकल नवोपक्रम व तंत्रज्ञान विकासातील योगदान<br>२. संगणक ज्ञान व मराठी,हिंदी, इग्लिश भाषेचे पुरेसे ज्ञान |
| मानधन | : | प्रतिमाह रु.६०,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत.) तसेच सदर मानधन हे १० - कंत्राटी सेवा या लेखाशिर्षाखाली अनुदान उपलब्धतेच्या व उपस्थितीच्या अधिन राहुन अदा करण्यात येईल. |

| पदनाम | | वैद्यकीय अधिकारी (**Medical Officer)** |
|---|---|---|
| वयोमर्यादा | : | **कमाल वयोमर्यादा** ५७ वर्षा**पर्यंत** जास्त नसावे. (प्रत्यक्ष मुलाखतीच्या दिवशी) |
| शैक्षणिक अर्हता | : | १.संविधिक विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची योग व निसर्गोपचार पदवी (B.N.Y.S.) / आयुर्वेद पदवी (B.A.M.S.).<br>२.राज्य किंवा केंद्रशासन मान्यता प्राप्त संस्थेमधुन नोंदणी आवश्यक |
| इतर पात्रता (Desirable) | : | १.संविधिक विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची योग व निसर्गोपचार/ आयुर्वेद पदव्युत्तर पदवी (B.N.Y.S. MD / B.A.M.S. MD)<br>2. क्लिनिकल नवोपक्रमातील योगदान<br>३. संगणक ज्ञान व मराठी,हिंदी, इग्लिश भाषेचे पुरेसे ज्ञान |
| मानधन | : | प्रतिमाह रु.५०,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत.) तसेच सदर मानधन हे १० - कंत्राटी सेवा या लेखाशिर्षाखाली अनुदान उपलब्धतेच्या व उपस्थितीच्या अधिन राहुन अदा करण्यात येईल. |

**इतर अटी**

१ कंत्राटी पध्दतीने करावयाच्या नियुक्तीचा कालावधी हा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडुन नियमित नियुक्तीने किंवा आस्थापना मंडळाकडुन पदोन्नतीने अथवा बदलीने तसेच अन्य प्रशासनिक कारणास्तव उमेदवार उपलब्ध होईपर्यन्त अथवा ११ महिने कालावधी किंवा वयाची ५८ वर्षे या पैकी जे अगोदर घडेल तो कालावधी राहील. मात्र कोणत्याही परिस्थितीत ११ महिन्याच्या कालावधीनंतर खंड दिल्याशिवाय पुनः करार पध्दतीने नियुक्ती दिली जाणार नाही. तथापी सदर उमेदवाराने त्याच्या वयाची ५८ वर्षे पूर्ण केल्यानंतर अशा उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत पुनर्नियुक्त्या देण्यात येणार नाहीत.

२. सदर पदावर नियमित उमेदवारांची नियुक्ती झाल्यास त्या तारखेस किंवा ११ महिन्यानंतर कंत्राटी स्वरुपाची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

३. नियुक्तीसाठी बाहयशक्तीचा दबाव अथवा शिफारस आणणारे उमेदवार नियुक्तीसाठी आपोआप अपात्र ठरतील.

४. सदर पदावर नियमीत उमेदवाराची नियुक्ती झाल्यास त्या तारखेस तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने केलेली नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

५. नियमित नियुक्त आणि कार्यरत वैद्यकीय अधिकाऱ्यांप्रमाणे पदाची कर्तव्ये व जबाबदा-या पार पाडाव्या लागतील. तसेच त्यांचेप्रमाणे उमेदवारांचे कामाचे तास राहतील तसेच त्यांना प्राप्त होणारे कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

६. उमेदवारास सार्वजनिक सुटटी आणि रविवार व्यतिरिक्त फक्त ०८ नैमित्तीक रजा अनुज्ञेय राहतील. इतर कोणत्याही रजा अनुज्ञेय राहणार नाहीत.

७. कंत्राटी पध्दतीवरील नियुक्त उमेदवारास राजीनामा द्यावयाचा झाल्यास त्यांनी (०३) महीन्याची आगाऊ नोटीस अधिष्ठाता, शासकीय योग व निसर्गोपचार महाविद्यालय व संलग्नित रुग्णालय यांचेकडे देणे बंधनकारक राहील. ते शक्य नसल्यास (०३) महिन्याच्या मानधनाची रक्कम शासकीय कोषागारात जमा केल्यानंतर त्याचा/तिचा राजीनामा मंजुर करता येईल.

८. कंत्राटी पध्दतीवरील नियुक्ती केलेल्या उमेदवारांच्या कामकाजाचा आढावा निवासी वैद्यकीय अधिकारी व अधिष्ठाता यांचेकडून नियमीतपणे घेण्यात येईल. असा आढावा असमाधानकारक असल्यास संबधीत उमेदवारांच्या नियुक्त्या पुर्वसुचना न देता समाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठांताकडे राहतील.

९. कंत्राटी पध्दतीवरील नियुक्त उमेदवारांना त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या विहित कामकाज पार पाडल्यानंतर रुग्णालयीन कर्तव्ये व जबाबदा-यावर विपरीत परीणाम होणार नाही याची दक्षता घेवुन खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्यास मुभा राहील. तसेच त्यांना कार्यालयीन वेळेत वैद्यकीय व्यवसाय करता येणार नाही.

१०. कंत्राटी पध्दतीवरील नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही व न्यायालयातही करार पध्दतीची नियुक्ती कायम करण्याबाबतचा दावा करता येणार नाही. तसेच करार पध्दतीवरील काम केलेला कालावधी सेवानिवृत्तीच्या लाभासाठी विचारांत घेता येणार नाही.

११. नियुक्ती आदेश मिळाल्यापासुन (७) दिवसाच्या आत नियुक्तीच्या ठिकाणी रुजु न झाल्यास नियुक्तीवरील दावा आपोआप संपुष्टात येईल.

१२. कार्यालयीन वेळेत खाजगी व्यवसाय करता येणार नाही. तसे आढळल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

१३. शासन निर्णयातील अटी व शर्तीचे पालन करणेसंबधीची तसेच कायम नियुक्तीसाठी न्यायालयात दावा दाखल न करणेसंबधीचे बंधपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच शासन/सक्षम प्राधिकरण/कार्यालयाकडुन वेळोवेळी प्राप्त निर्देश/आदेशाचे पालन करणे संबंधितास बंधनकारक राहील.

१४. नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर फेरबदल करण्याचे किंवा रद्द करण्याचे सर्व अधिकार अधिष्ठाता,शासकीय योग व निसर्गोपचार महाविद्यालय, उत्तूर, ता. आजरा, जि. कोल्हापूर यांचेकडे राखीव आहेत.

१५. उमेदवार सध्या अन्य संस्थेत कार्यरत असल्यास संबंधित संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र प्रत्यक्ष मुलाखतीच्या दिवशी सादर करणे तसेच उमेदवाराची निवड झाल्यास रुजु होते वेळी संबंधित संस्थेचे कार्यमुक्ती आदेश (Relieving Order) सोबत असणे आवश्यक राहील.

१६. उमेदवार वयाची ५८ वर्षे पुर्ण केल्यानंतर त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

१७. सदर पदाचे कंत्राटी मानधन १० - कंत्राटी सेवा या लेखाशिर्षाखाली अनुदान उपलब्धतेनुसार अदा करण्यात येत असल्याने सदर लेखाशिर्षात अनुदान उपलब्ध होईपर्यंत विलंब होऊ शकतो. त्यासाठी कार्यालयाकडे कोणताही तगादा लावता येणार नाही.

१८. CME प्रशिक्षण/PhD/कार्यशाळा इत्यादी कालावधी कर्तव्य कालावधी धरण्यात येणार नाही. त्याकरिता नियमाप्रमाणे नैमित्तिक रजा भरून द्यावी लागेल अथवा सदर CME प्रशिक्षण/PhD/कार्यशाळा दरम्यानच्या कालावधीचे वेतन कपात करण्यात येईल.

१९. कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारास कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्यात येणार नाहीत.

२०. उमेदवारानी मुलाखतीस येतांना आवश्यक ते सर्व संबंधीत मुळ कागदपत्रे व त्यांच्या सत्यप्रती सोबत आणाव्यात तसेच अनुभव प्रमाणपत्र, सध्या इतर संस्थेत कार्यरत असल्यास सदर संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र आणणे अनिवार्य राहील.

२१. बिगर सेवानिवृत्त गटातून कंत्राटी पद्धतीने नियुक्त होणाऱ्या अध्यापकांची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्याला पूर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.

२२. पात्र उमेदवाराने प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा.

तरी सदर पदावर नियुक्तीसाठी इच्छुक व पात्र उमेदवारांनी आयुष संचालनालयाच्या **www.mahaayush.in** या वेबसाईट वर उपलब्ध करुन दिलेल्या विहीत नमुन्यातच अर्ज भरुन आवश्यक प्रमाणपत्राच्या मुळ प्रती तसेच सदर प्रमाणत्राच्या एक स्वंसांक्षाकीत प्रतींसह शासकीय योग व निसर्गोपचार महाविद्यालय उत्तुर ता. आजरा जि. कोल्हापूर येथे प्रत्यक्ष मुलाखतीच्या गुरुवार दि.१२/०२/२०२६ रोजी स्वखर्चाने प्रत्यक्ष मुलाखतीकरीता सकाळी १०.०० वाजता उपस्थित रहावे.

मुलाखतीच्या स्थळी उपस्थित राहणेकरिता आपणांस कोणताही प्रवास खर्च अनुज्ञेय राहणार नाही, याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

वैद्या भाग्यश्री म. खोत
अधिष्ठाता,
शासकीय योग व निसर्गोपचार रुग्णालय,
उत्तूर, ता. आजरा, जि. कोल्हापूर

# अर्जाचा नमुना

महाराष्ट्र शासन
शासकीय योग व निसर्गोपचार रुग्णालय ,
उत्तूर, ता. आजरा, जि. कोल्हापूर

पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवून त्यावर स्वत: स्वाक्षरी करणे

प्रति,
मा. अधिष्ठाता,
शासकीय योग व निसर्गोपचार रुग्णालय,
उत्तूर, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**विषय : आपल्या रुग्णालयातील -------------------------------------- या पदावर तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पद्धतीने मानधन तत्त्वावर ११ महिन्यांच्या कालावधीकरीता नियुक्ती मिळणे बाबतचा अर्ज सादर करणे बाबत.**

**संदर्भ : आपली जाहिरात शुध्दीपत्रक दिनांक -०२/०२/२०२६**

मा. महोदय

उपरोक्त संदर्भित जाहिरातीस अनुसरुन मी आपल्या रुग्णालयातील .......................................या पदावर तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पद्धतीने ११ महिन्यांच्या कालावधीकरीता नियुक्ती मिळणेबाबतचा अर्ज सादर करीत आहे.

माझी संपूर्ण माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | संपूर्ण नाव | | : | | | |
| | | | | आडनाव | स्वत:चे नाव | वडिलांचे/पतीचे नाव |
| २ | पत्रव्यवहाराचा पत्ता | | : | | | |
| ३ | भ्रमणध्वनी क्रमांक | | : | | | |
| ४ | ई-मेल | | : | | | |
| ५ | जन्म दिनांक | | : | | | |
| ६ | अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिनांकास वय | | : | | | |
| | | | | वर्ष | महिने | दिवस |
| ७ | राष्ट्रीयत्व | | : | | | |
| ८ | शैक्षणिक अर्हता : माध्यमिक / उच्च माध्यमिक /पदवी (बी.एन.वाय.एस/बी.ए.एम.एस.)/ पदव्युत्तर प्रथम वर्षापासून सुरु करावे व सोबत सर्व वर्षांच्या गुणपत्रिका जोडाव्यात. | | | | | |
| | अ.क्र. | उत्तीर्ण केलेल्या परीक्षा | : | बोर्डाचे/विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण केल्याचे वर्ष | प्राप्त टक्केवारी |
| | १ | SSC | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २ | HSC | | | | |
| | ३ | BNYS / BAMS | | | | |
| | ४ | MD (BNYS / BAMS) | | | | |
| | ५ | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | अवगत असणाऱ्या भाषा: योग्य ठिकाणी (✓) अशी खूण करावी. | | | | |
| | मराठी | हिंदी | इंग्रजी | संस्कृत | अन्य |
| | | | | | |

| | | |
|---|---|---|
| १० | सध्या उमेदवार इतर संस्थेमध्ये कार्यरत आहे का? | होय / नाही |
| ११ | असल्यास संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र जोडले आहे का? | होय / नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | कामाचा अनुभव : (प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती जोडल्या असतील तरच ग्राह्य धरला जाईल) | | | |
| | अ.क्र. | संस्थेचे नाव | धारण केलेले पद | अनुभवाचा कालावधी |
| | १. | | | |
| | २. | | | |
| | ३. | | | |
| | ४. | | | |

| | |
|---|---|
| १३ | पुरस्कार मिळाले असतील तर त्यांचा तपशील : |
| | |
| | |

| | | |
|---|---|---|
| १४ | प्रमाणपत्रासोबत जोडलेल्या कागदपत्रांचा तपशील : | |
| | १. | |
| | २. | |
| | ३. | |
| | ४. | |
| | ५. | |
| | ६. | |
| | ७. | |
| | ८. | |
| | ९. | |
| | १०. | |
| | ११. | |
| | १२. | |

उमेदवारीची स्वाक्षरी
(संपूर्ण नावासहित)

# अर्जासोबत जोडावयाच्या कागदपत्रांची यादी

| Sr.No. | Document Name | Yes/No | Remark |
|---|---|---|---|
| 01 | AAdhar card | | |
| 02 | SSC Passing Certificate (For D.O.B.)/T.C. (any one) | | |
| 03 | Nationality/Domicile | | |
| 04 | BNYS / BAMS 1st Year to Final Year Marksheet | | |
| 05 | BNYS / BAMS passing Certificate | | |
| 06 | Internship Completion Certificate | | |
| 07 | BNYS / BAMS Degree Certificate | | |
| 08 | PG Degree Certificate/Passing Certificate (if applicable) | | |
| 09 | Registration Certificate of State Council | | |
| 10 | MS-CIT or Equivalent Qualification | | |
| 11 | Experience Certificate | | |
| 12 | No Objection Certificate from current institute | | |
| 13 | Additional qualification in concern subject if any (Ph.D.) (if applicable) | | |
| 14 | Participation in National/International CME / Conference / Seminar etc. | | |
| 15 | Awards | | |

**(रु. ५०० च्या बंधपत्रावर)**

# <u>प्रतिज्ञापत्र</u>

मी श्री/श्रीमती/कुमारी ......................................................प्रतिज्ञापुर्वक नमुद करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती पुर्णतः खरी असुन ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्यावर किंवा नियुक्तीनंतर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कार्यवाही होईल, याची मला जाणीव आहे. तसेच सदरची नेमणुक निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी पध्दतीवर असल्यामुळे नियमीत नियुक्तीसाठी मला हक्क सांगता येणार नाही आणि जाहिरातीत उल्लेखीत कारणास्तव नियमीत नियुक्तीने उमेदवार/महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडुन/आस्थापना मंडळाकडुन/बदलीने/ पदोन्नतीने उपलब्ध झाल्यास माझी तात्पुरती स्वरुपाची कंत्राटी नेमणुक आपोआप रद्द होईल, याची मला जाणीव आहे. **यासंदर्भात करार पद्धतीचे नियुक्ती नियमित करण्याबाबतचा दावा कोणत्याही न्यायालयात करणार नाही. तसेच करार पद्धतीवरील काम केलेला कालावधी सेवानिवृत्तीच्या लाभासाठी विचारात घेतला जाणार नाही, याची मला जाणीव आहे.**

ठिकाण :

दिनांक : उमेदवाराची स्वाक्षरी

(संपूर्ण नावासहित)

(सध्या कार्यरत वैद्यकीय अधिकाऱ्यानी मुलाखतीच्या वेळी सादर करणे बंधनकारक)

**–ना हरकत प्रमाणपत्र –**

प्रमाणित करण्यात येते की, वैद्य/वैद्या ..............................................या संस्थेत दिनांक.................... पासुन ............................पर्यन्त ----------------- या पदावर कार्यरत आहेत. वैद्य/वैद्या .......................................यांची शासकीय योग व निसर्गोपचार रुग्णालय उत्तुर ता.आजरा जि. कोल्हापूर येथे --------------------------- या पदावर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती झाल्यास संस्था त्यांना तात्काळ कार्यमुक्त करेल. तसेच त्यांच्या मुलाखतीस संस्थेची काहीही हरकत नाही.

संस्थेचा शिक्का

संस्थाप्रमुख
(संपूर्ण नाव व पदनाम )

ठिकाण :

दिनांक :

(रुजू होताना खालील प्रमाणपत्र सादर करावे)

**प्रतिज्ञापत्र** (विवाहीत उमेदवारांसाठी)

महाराष्ट्र नागरी सेवा मर्यादित (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ नुसार

नियम अ

मी श्री/श्रीमती ............................................ श्री. ............................... यांचा मुलगा/मुलगी/पत्नी, वर्षे.................... राहणार याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/ करते की,

१. मी ........................................ या पदासाठी अर्ज दाखल केला आहे.

२. आज रोजी मला ............... (संख्या) इतकी हयात मुले आहेत.

त्यापैकी दिनांक २८.०३.२००५ यानंतर जन्माला आलेली मुलांची संख्या ........... आहे. (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा)

हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोनपेक्षा जास्त असेल तर दिनांक २८.०३.२००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे ...................................... या पदासाठी अनर्ह/ अपात्र ठरविण्यास पात्र राहील याची मला जाणीव आहे.

ठिकाण -

दिनांक -

उमेदवाराचे नाव व सही